<u>प्रेस नोट</u>

दिनांक ०४/१२/२०२०

**बोईसर पोलीस स्टेशन येथील पोलीस शिपायांना लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली अटक**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | **ठाणे** |
| गुन्हा नोंद क्रमांक | बोईसर पोलीस स्टेशन, गुन्हा नोंद क्र. ३०१/२०२०, |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम(संशोधन २०१८)सन १९८८ चे कलम ७,१२ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **१) विलास मंगेश काळे, वय २९ वर्षे, पोलीस शिपाई/१४५**<br>**२) संदिप धर्मा दांडेकर, वय ३९ वर्षे, पोलीस नाईक/१४२९, दोन्ही नेम. बोईसर पोलीस स्टेशन, पालघर (वर्ग ३)** |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | २५,०००/–रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २०,०००/–रुपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार व त्यांचे मित्र याचे ODC ट्रेलर ट्रक बोईसर पोलीस स्टेशनच्या हद्दीतून सुरक्षित बाहेर काढून देण्याकरीता वरील नमुद **लोकसेवक क्र.१** यांनी तक्रारदार यांचेकडे २५,०००/– रुपये लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती २२,०००/–रुपये स्विकारण्याचे ठरले.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०४/१२/२०२० रोजी पडताळणी केली असता, नमुद लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने अेसीबी, ठाणे युनिटने सापळयाचे आयोजन करून लोकसेवक १) **विलास मंगेश काळे** यांना तक्रारदार यांचेकडून २०,०००/–रुपयांची लाच स्विकारताना खैरा फाटक चेक पोस्ट, बोईसर येथे रंगेहात पकडण्यात आले व लोकसेवक क्र. २) **संदिप धर्मा दांडेकर** यांना तक्रारदार यांना लाच देण्यास प्रोत्साहन दिल्याबददल ताब्यात घेण्यात आले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबदद्ल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :– ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं :– १०६४
दुरध्वनी क्र. :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस् ॲप क्र. :– ९९३०९९७७००

( महेश पाटील )
पोलीस अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो,ठाणे परिक्षेत्र,ठाणे

पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो
सत्यमेव जयते
ठाणे परिक्षेत्र, ठाणे.